महाराष्ट्र शासन
आरोग्य विभाग
जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

०२५१-२७०९४३२
०२५१-२७०८७३०
ulhasnagarcs@gmail.com

जा.क्र.मरुउ/भांडार/अंतर्गत संपर्क यंत्रणा देखभाल दुरुस्ती दरनिश्चिती
दरपत्रके/ 8318-19 /२६
दिनांक 19 /५ /२०२६

# जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील सन-२०२६-२०२७ या कालावधीमध्ये रुग्णालयातील सर्व विभाग,वॉर्ड,कार्यालये यांच्याशी संपर्क करण्यासाठी कार्यरत असलेल्या अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणेच्या वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी व देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये सदर यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी किंवा वाढीव कामांसाठी लागणा-या साहित्यांचे सोबत जोडलेल्या यादीनुसार दर निश्चितीसाठी दरपत्रके मागविण्याचे निश्चित केलले आहे. तरी इच्छुक अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणेचे देखभाल दुरुस्तीचे काम करणारे व्यापारी यांनी बंद लिफाफामध्ये खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत (खालील अ.क्र.१४ नुसार) जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी. स्थानीक देखभाल दुरुस्ती सेवा धारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

## दरपत्रके सादर करणा-या देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा धारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती

१) इच्छुक अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

२) अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारक यांना बाबनिहाय फक्त ०१ दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये.असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील.उदा. जर दोन सि.सि.टि.व्हि कॅमेरे व सि.सि.टि.व्हि शी संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती जी "कंपनी एक्स"चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती"कंपनी वाय" ची मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी.अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-यासाठी अधिकृत अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या सेवा धारक, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील.

३) दरपत्रकात अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-यासाठी आवश्यक असलेल्या बाबी बद्दलची सविस्तर माहीती जसे कंपनी, क्षमता व इतर बाबी नमुद करणे आवश्यक आहे.पुरवठादार,निर्माणकर्ते (Manufacturer)यांचे अधिकृत अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणारे व्यापारी असणेबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

५) संस्था/दुकान,साहित्य पुरवठा/विक्रि विषयक/सेवा पुरवठा विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडवा.

६) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता/ठिकाण- जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

७) व्यापारी लिफाप्यामध्ये यादीमधील कंपनी, क्षमता यानुसार प्रती बाबनिहाय दर GST करांसह नमुद करावेत.

८) विहीत कालावधीत अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी उपलब्ध न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

९) विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर (GST Number) सहीत देयके स्विकारण्यात येतील. दर हे GST व इतर सर्व करांसह हमाली,पोहच,स्थापीत करणे खर्चासहीत असावे.सर्व साहित्य मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ येथे पोहच करावी लागेल.तसेच पोहोच करतेवेळी त्याची गणना यादीनुसार करुन देणे बंधनकारक राहिल.

१०) मंजुर न्युनतम दरांवर देखभाल दुरुस्ती धारकास काम करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने सेवा घ्यावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकाकडुन वसुल केली जाईल.सर्व वस्तुंचे दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावेत.

११) वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१२) मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ या रुग्णालयाकडील अंतर्गत संपर्क (INTERCOM) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचा व साहित्याचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. सदरील देखभाल दुरुस्ती सेवा आय.एस.आय मार्क दर्जाची किंवा त्यासमान दर्जाची असावी.

१३) अंतर्गत संपर्क (INTERCOM) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम करणा-या धारकास कोणत्याही शासकीय विभागाने अंतर्गत संपर्क (INTERCOM) यंत्रणा व त्या संबधित असलेल्या यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१४) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासून सात दिवस दिनांक २९/५/२०२६ संध्या.५.०० वाजेपर्यंत असेल (कार्यालयीन सुट्टी वगळुन) उशिरा प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१५) दरपत्रके उघडण्याची तारीख ०१/६/२०२६ संध्या ०५.३० वा. किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१६) कोणतेही लेखी किंवा तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा अंशत:खरेदी प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.जिल्हा शल्यचिकीत्सक,मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३ यांनी राखून ठेवलेले आहेत.

१७) या रुग्णालयाकडुन मागणी केलेल्या बाबींचेच व्यापारी लिफाफात दर GST करांसह नमुद करावे.

१८) मान्य न्युनतम दर आदेश निर्गमित केल्यापासुन एक वर्ष (३६५ दिवस) कालावधीसाठी वैध राहतील.

(डॉ.मनोहर बनसोडे)
जिल्हा शल्यचिकीत्सक
मध्यवर्ती रुग्णालय,उल्हासनगर-३

प्रत- या रुग्णालयाच्या नोटीस बोर्डावर डकवुन प्रसिध्दीसाठी .

NHM IT cell या वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी

Scanned with OKEN Scanner

# व्यापारी लिफाफा

**आंतर्गत संपर्क यंत्रणा देखभाल दुरुस्तीसाठी असलेली यंत्रणा व त्यांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्यांची यादी साहित्य**

रुग्णालयातील सर्व विभाग,वॉर्ड,कार्यालये यांच्याशी संपर्क करण्यासाठी कार्यरत असलेल्या अंतर्गत संपर्क (INTERCOM ) यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीसाठी व देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये वाढीव कामांसाठी किंवा दुरुस्ती कामांसाठी लागणा-या साहित्यांची **साहित्य निहाय यादी**

| अ.क्र | रुग्णालयामधील intercom शी संबधित देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध असलेल्या बाबी | देखभाल दुरुस्तीसाठी प्रति ०१ नग वार्षीक दर | एकुण बाबींचा वार्षीक दर |
|---|---|---|---|
| १ | ४६ टेलिफोन बुथ | | |
| २ | ०१ स्कायलिंक इंटरकॉम मशिन | | |

| अ.क्र. | इंटरकॉम यंत्रणा दुरुस्तीसाठी किंवा वाढीव कामासाठी आवश्यक असलेल्या बाबी | प्रति नग/मिटर रक्कम (दर) |
|---|---|---|
| १ | टेलिफोन बुथ | |
| २ | केबल | |
| ३ | मदरबोर्ड ( Extension Card ) | |
| ४ | टेलिफोन सॉकेट | |

स्वाक्षरी

देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा धारकाचे संपुर्ण नाव-------------------------

देखभाल दुरुस्ती सेवा पुरवठा करणा-या संस्थेचे नाव---------------------

संस्थेचा संपुर्ण पत्ता --------------------------------------------------

Scanned with OKEN Scanner